**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Chhatrapati Sambhajinagar– 431 004,
Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A⁺' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
acadsection@bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४,
महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ⁺' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
Email : dyregistrar.acad@bamu.ac.in
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

## * महत्वाचे परिपत्रक *

## AICTE ची मान्यता नसलेल्या संबंधित महाविद्यालयांनी त्वरीत AICTE मान्यता घेणे व AICTE अंतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सर्व संबंधित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे (CET) प्रवेश प्रक्रिया राबविणेबाबत...

**संदर्भ :-**
1. **मा. विद्या परिषद ठराव क्र. २० दिनांक ०८-०४-२०२४**
2. **अभ्यासक्रम विभाग/२०२४/२६४६७ दि. २०-०५-२०२४**
3. **AICTE/RB/M-१३/२५९२/२०२४-२५-Regb dated १८-१२-२०२४**
4. **मा. सह सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र ४१/तांशि-४ दि. २०-०५-२०२५**
5. **टीईटी-१२२५/सी.आर. १४/कॅप-२०२५/२०८५, दि. ११-०६-२०२५**
6. **तंशिप्र-१२२५/प्र.क्र १४/केंप्रप्र/२०२५/२४७३ दि. ३०-०७-२०२५**
7. **मा. कुलगुरू महोदयांनी आदेशीत केलेली टिपणी दिनांक २०-०१-२०२६**

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार AICTE अंतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम असलेल्या व विद्यापीठाची संलग्नता असलेल्या महाविद्यालयांतील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या व AICTE अंतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना AICTE ची मान्यता असणे आवश्यक असून केंद्रीय पद्धतीने घेतलेल्या प्रवेशपूर्व परीक्षेतील (CET) पात्र विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयांने प्रवेश देणे बंधनकारक आहे.

करिता सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करुन शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता अद्यापही ज्या महाविद्यालयांनी AICTE अंतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी AICTE ची मान्यता घेतलेली नाही, अशा महाविद्यालयांनी त्वरीत मान्यता घेणेबाबत कार्यवाही करावी तसेच सर्व संबंधित महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांतील प्रवेश हे केवळ केंद्रीय प्रवेशपूर्व परीक्षा (CET) उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात यावा.

CET Cell ने विहित केलेली प्रवेश पूर्व परीक्षा पात्र विद्यार्थ्यांऐवजी सर्व संबंधित संलग्नीत महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयात सुरू / संलग्नीत असलेल्या AICTE अंतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना महाविद्यालय स्तरावर प्रवेश दिल्याचे निदर्शनास आल्यास विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील व यास सर्वस्वी महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहील तसेच भविष्यात विद्यार्थी प्रवेश रद्द करणेबाबत काही न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

**संदर्भ क्र शैक्ष/संगल्न/पीबीजी/२०२५-२६/** 9924 ][
**दिनांक २०-०१-२०२६** ][

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ * शैक्षणिक विभाग * छत्रपती संभाजीनगर *

**प्रतिलिपी :-**

१) **अध्यक्ष,** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंदरलोक इमारत, जनपथ, नवी दिल्ली ११०००१ यांना माहितीस्तव अग्रेषित

२) **संचालक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,** ८ वा मजला, न्यू एक्सलसियर इमारत, ए.के. नाईक मार्ग, मुंबई, ४०० ००१ यांना माहितीस्तव अग्रेषित

३) **कक्षाधिकारी, मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

४) **मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्वीय सहाय्यक, प्र कुलगुरु कार्यालय,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

५) **मा. अध्यक्ष/ सचिव,** सर्व संबंधित संलग्नीत महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

६) **मा. जनसंपर्क अधिकारी,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

७) **मा. संचालक,** युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देवून विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळाच्या परिपत्रक विभागात प्रसिद्ध करण्यात यावे, ही विनंती.

८) **उपकुलसचिव, अभ्यासक्रम विभाग,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित

९) **कक्षाधिकारी, पात्रता विभाग,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित

१०) **विद्यार्थी व पालक** यांना या पत्राची एक प्रत बातमी स्वरुपात वर्तमानपत्रात देण्यात येऊन आव्हान करण्यात येते की, प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाने AICTE अंतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी संबंधित महाविद्यालयाने मान्यता घेतलेली आहे किंवा कसे? याबाबत सखोल माहिती घेऊनच प्रवेशबाबत प्रक्रिया करावी.

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ * छत्रपती संभाजीनगर *
शैक्षणिक विभाग